सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२६/ 1105
दिनांक :- 28 APR 2026

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित,
तंत्रनिकेतने/अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र/बीबीए/बीसीए/एमबीए/एमसीए अभ्यासक्रमाच्या संस्था
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- रस्ता अपघातातील दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान -२०२६ राबविणेबाबत.**

**संदर्भ :-१.** उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२०२६/सं.क्र.१०६/समन्वय, दि.१० एप्रिल,२०२६
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D१६/३४/२०२६-DESK१६, दिनांक १६/०४/२०२६

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन पत्रासोबत जोडलेले प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल, जि.रायगड यांचे क्रमांक ४३३/आस्थापना/प्रापका/पनवेल/२०२६, दिनांक १६/०३/२०२६ चे पत्र कृपया पहावे.

सदर पत्राचे अवलोकन करुन त्यातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना देण्यात याव्यात व त्याबाबतचा कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहपत्र :- वरील प्रमाणे.

(डॉ. व्हि. आर. मानकर)
**प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,**
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना ईमेल करण्याकरिता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६/४७६,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

DTEM-D१६/३४/२०२६-DESK१६

प्रति,
सह संचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/छ.संभाजीनगर/अमरावती/नागपूर

संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

विषय :- रस्ता अपघातातील "दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान-२०२६ राबविणेबाबत.

संदर्भ :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२६/सं.क्र.१०६/समन्वय, दि.१० एप्रिल, २०२६.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन शासन पत्रासोबत जोडलेले प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल, जि. रायगड यांचे क्रमांक ४३३/आस्थापना/प्रापका/पनवेल/२०२६, दिनांक १६/३/२०२६ चे पत्र कृपया पहावे.

सदर पत्राचे अवलोकन करुन त्यातील निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या कार्यालयाच्या अधिपत्याखालील संस्थाना देण्यात याव्यात.

Digitally signed by
DHANAPAL A KAMBLE
Date: 16-04-2026
10:28:04

(डा.धनपाल कांबळे)
सह संचालक,
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
Email ID:- do.asthahte-mh@gov.in

क्रमांक:- संकीर्ण -२०२६/सं.क्र. १०६/समन्वय दिनांक:- १० एप्रिल, २०२६.

प्रति,

१) संचालक, (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) संचालक, (तंत्र शिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) संचालक, (कला), कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) संचालक (ग्रंथालय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय:- रस्ता अपघातातील " दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान-२०२६" राबविणेबाबत

सोबत "रस्ता अपघातातील " दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान-२०२६" राबविणेबाबत या विषयावरील प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल, जि. रायगड यांचे क्रमांक ४३३/आस्थापना/प्रापका/पनवेल/२०२६, दिनांक १६/३/२०२६ चे पत्र माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

आपली,
सं. चं. जाधव
(संचिता जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत,

उपसचिव, (मशि/विशि/ तांशि/ साशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

F:\RUPESH\cr०१-२६ - General Endorsement.docx

Reply all | Delete Junk | ...

# रस्ता अपघातातील दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान 2026 राबविणेबाबत

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. 629
दि. 18/03/26

Jayant Tarabai Ramesh Chavan <rto.46-mh@mah.gov.in>
Tue 3/17/2026 11:04 AM

Reply all |

To: raigad se <raigad.se@mahapwd.gov.in>; eepanvelpwd <eepanvel.pwd@gmail.com>; cp <cp@cidcoindia.com>; panvelcorporation <panvelcorporation@gmail.com>; chieftoll <chieftoll@msrdc.in>; zpraigad <zpraigad@gov.in>; CEO ZP Raigad; Shailendra Deolankar <director.dhepune@nic.in>; nocdhepune <nocdhepune@gmail.com>; B.Venugopal Reddy, A.C.S.

Cc: Shri. Rajesh Narvekar <transport.commr-mh@mah.gov.in>; Raigad Collector; roadsafety maharashtra <roadsafety.maharashtra@gmail.com>

Inbox



433-1.pdf
1 MB

Show all 2 attachments (10 MB) Download all

Please find attachments

**With Regards,**

**RTO PANVEL**

सत्यमेव जयते

• सडक सुरक्षा जीवन रक्षा •

**प्रादेशिक परिवहन कार्यालय**
**पनवेल**

उ.स. (ओसेकी)

18/3

23/3

24.3.2026

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल**

व्हॅली शिल्प को.ऑप.हौ.सो. बिल्डींग नं. एच-1, दुसरा मजला, सेक्टर 36, खारघर नोड, ता.पनवेल, जि.रायगड, 410210
दूरध्वनी क्र. 022-27424444 ई-मेल - rto.46-mh@gov.in

जा.क्र.433/आस्थापना/प्रापका/पनवेल/2026 दि. 16.03.2026

प्रति,

**1. मा. सदस्य सचिव,**
जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा अधीक्षक अभियंता,
रायगड सा.बां.मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई

**2. कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पनवेल

**3. कार्यकारी अभियंता**
सिडको (CIDCO) - रस्ते आणि नियोजन
सिडको भवन, सखाराम पाटील मार्ग, सेक्टर १०,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

**4. शहर अभियंता**
पनवेल महानगरपालिका

**5. कार्यकारी अभियंता**
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,
मुंबई

**6. कार्यकारी अभियंता,**
बांधकाम (रस्ते) विभाग
जिल्हा परिषद रायगड-अलिबाग

**7. विभाग प्रमुख,**
उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग
रायगड विभाग

**8. जिल्हा शिक्षणाधिकारी**
(प्राथ व माध्यमिक),
जिल्हा परिषद रायगड-अलिबाग

**9. शिक्षण अधिकारी,**
शिक्षण विभाग, पनवेल महानगरपालिका

**विषय:-** रस्ता अपघातातील "दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा अभियान 2026" राबविणेबाबत.
**संदर्भ:-** राज्य रस्ता सुरक्षा कक्षामार्फत निर्गमित आदेश दि. 11.03.2026

राज्यातील रस्ते अपघातांची सद्यस्थिती विचारात घेता सन २०२५ मधील प्राथमिक आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात एकूण ३६,४५० पेक्षा जास्त अपघात झाले असून, त्यामध्ये सुमारे १५,५४९ नागरिकांचा मृत्यू झाला आहे, तर ३२,१४७ हून अधिक नागरिक जखमी झाले आहेत. विशेषतः एकूण मृत्यूंपैकी ५७ % मृत्यू हे दुचाकीस्वारांचे आहेत तर २१% मृत्यू हे पादचाऱ्यांचे आहेत. जागतिक स्तरावर रस्ते अपघातातील मृत्यूंचे प्रमाण सन २०३० पर्यन्त ५०% पेक्षा कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) मानकानुसार, 'Safe System Approach' अंतर्गत रस्ते अभियांत्रिकी, अंमलबजावणी आणि जनजागृती वर भर देणे आवश्यक आहे.

दिनांक 28 व 29 जानेवारी 2026 रोजी आयोजित करण्यात आलेल्या रस्ते अपघात आढावा बैठकीमध्ये राज्यातील अपघातांचे विश्लेषण केले असता राज्यातील रस्ते अपघातांचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. त्याअंतर्गत सन 2026 हे वर्ष 'दुचाकीस्वार आणि पादचारी वाचवा' अभियान म्हणून राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

d:\ravi\other\letter est 1..docx

प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती रायगड यांचेमार्फत आपणास आवाहन करण्यात येते की, चालू वर्ष 2026 मध्ये रस्ते अपघातात होणारे मृत्यू टाळण्यासाठी विशेषतः 'दुचाकीस्वार' आणि 'पादचारी' यांच्या सुरक्षेसाठी आपले विभागामार्फत पुढीलप्रमाणे तातडीचे उपाययोजना हाती घ्याव्यात.

1. रस्ता ओलांडण्यासाठी उपाययोजना- गर्दीच्या ठिकाणी पादचाऱ्यांना रस्ता ओलांडण्यासाठी उपाययोजना कराव्यात. पादचारी पथमार्गावर झेब्रा क्रॉसिंग चे पट्टे रंगवणे, फुटपाथवरून रस्त्यावर पादचारी येऊ नये म्हणून संरक्षक जाळ्या बसविणे, रस्ता ओलांडण्यासाठी फूट ओवर ब्रिज निर्माण करणे, भुयारी मार्ग तयार करणे, सिग्नल यंत्रणा बसवणे इ.

2. जनजागृती विषयक फलक प्रदर्शित करणे-

हेल्मेटचा वापर- "हेल्मेट नाही, तर प्रवेश नाही(चालक आणि पाठीमागील व्यक्ती दोन्हींसाठी)" अशा आशयाचे फलक सर्व सरकारी आस्थापनांमध्ये, महाविद्यालयांचे प्रवेशद्वारावर ठळकपणे प्रदर्शित करावेत.

शाळांमध्ये जनजागृती- प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती रायगड यांचेमार्फत आपले अनधिस्त प्राथमिक, माध्यमीक व उच्च माध्यमीक शाळांमध्ये सरकारी व खाजगी शाळांमध्ये जनजागृती विषयक फलक प्रदर्शित करण्यात यावे.(विहीत नमुन्यातील फलकांची डिजीटल प्रत सोबत जोडली आहे)

अपघात प्रवण क्षेत्रे- ज्या ठिकाणी वारंवार अपघात होत असतात अशा ठिकाणांची यादी प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत करण्यात आली आहे(प्रत संलग्न) अशा ठिकाणी प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेल व जिल्हा रस्ता सुरक्षा समिती रायगड यांचेमार्फत दुचाकीस्वारांनी व पदचारी यांनी घ्यावयाची काळजी याबाबतचे फलक प्रदर्शित करावेत

सर्व टोल नाक्यावर बोर्ड बसविणे- सर्वसाधारणतः टोल नाक्यावर दुचाकी वाहनासाठी मोफत प्रवेश आहे. टोल नाक्यावरील डावीकडची लेन दुचाकी साठी निर्धारित असते. या ठिकाणी "हेल्मेट नाही, तर प्रवेश नाही(चालक आणि पाठीमागील व्यक्ती दोन्हींसाठी)" अशा आशयाचे फलक सर्व टोल नाक्यांच्या दोन्ही बाजूंना ठळकपणे लावावेत. यासाठीचे सुचना आपलेमार्फत संबंधीत टोल कंत्राटदार कंपनीस आपलेमार्फत देण्यात याव्यात.

3. अपघात- ज्या ठिकाणी पादचाऱ्यांचे अपघात जास्त होतात, तिथे रस्ते अभियांत्रिकीमधील त्रुटी (उदा. अनधिकृतपणे विभाजक तोडणे, पदपथांचा अभाव, महामार्गाला चुकीच्या पद्धतीने जोडणारे इतर रस्ते, भौगोलिक परिस्थिति इ.) शोधून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत (PWD/ NHAI) उपाययोजनांचा पाठपुरावा करावा.

रस्त्यांवरील अपघात कमी करणेकरीता वरीलप्रमाणे उपाययोजना करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(जयंत रमेश चव्हाण)
प्रादेशिक परिवहन अधिकारी(अ.का.)
पनवेल

प्रत - 1. मा. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, रायगड-अलिबाग यांना माहितीस्तव सविनय सादर
3. मा. सह परिवहन आयुक्त (रस्ता सुरक्षा कक्ष), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

d:\ravi\other\letter est 1..docx